सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६६

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )**

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१८/विधिविषयक/प्र.क्र. ६(२०१८) ++ १९२

दि. २७.०२.२०२०

प्रकरण क्रमांक ६/२०१८

धोम व धोम बलकावडी प्रकल्प यांच्यातील डी पी आर प्रमाणे पाणी वाटपा विषयी श्री नंदकुमार दगडु माने (पाटील), चंद्रगिरी कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था म. रहिमतपुर (सातारा) व दोन इतर, यांनी केलेल्या अपीला विषयी.

सोबत दि. २७.०२.२०२० चा मजनिप्रा आदेश क्र. २/२०२० जोडला आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे.

स्वाक्षरी
डॉ. रामनाथ सोनावणे
सचिव, मजनिप्रा

प्रति : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील), अध्यक्ष, चंद्रगिरी कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था (म), रहिमतपूर, सातारा ४१५५११

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

२) श्री. अविनाश माने, अध्यक्ष, कालभैरव कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११

३) श्री. शिवाजी माने, अध्यक्ष, पवनपूत्र कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११...................... याचिकाकर्ते

४) सचिव, (ज.सं.व्य व ला.क्षे.वि.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मॅडम काम रोड, मुंबई–४०००३२.

५) मुख्य अभियंता (ज.सं.) ज.सं.वि, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

६) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन प्रकल्प, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा ४१५५०३.

७) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा ४१५५०३.

८) जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोवई नाका, सातारा.

९) श्री. विलास नलावडे, हनुमंत पाणी वापर संस्था, अलजापुर, फलटण सातारा मार्फत ॲड. व्ही. एस. टाळकुटे, ५ पहिला माळा, पारेख व्होरा चेंबर्स, ६६, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१

१०) श्री. संतोष हनुमंतराव शिंदे, ज्योतिर्लींग पाणी वापर संस्था, कोपर्डे, ता. खंडाळा, जि. सातारा, ४१५५२१

दस्तावेज क्र. ६६

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

आदेश क्रमांक : ०२/२०२०

(आदेश क्रं. ०३/२०१९ च्या अनुषंगाने केलेल्या पुनर्विलोकन अर्ज व झालेल्या कामकाजाच्या अनुपालनार्थ निर्गमित केले)

धोम व धोम बलकावडी प्रकल्प यांच्यातील डी पी आर प्रमाणे पाणी वाटपा विषयी श्री नंदकुमार दगडु माने (पाटील), चंद्रगिरी कालवा वापर सहकारी सेवा संस्था म. रहिमतपुर (सातारा) व दोन इतर, यांनी केलेल्या अपीला विषयी प्रकरण क्र. ६/२०१८.

१) श्री. नंदकुमार दगडु माने (पाटील, अध्यक्ष, चंद्रगिरी कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्था (म), रहिमतनगर कळवा, सातारा ४१५५११

२) श्री. अविनाश जयवंत माने, अध्यक्ष कालभैरव कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११

३) श्री. शिवाजी कोंडीराम माने, अध्यक्ष, पवनपूत्र कालवा पाणी वापर सोसायटी, रहिमतपूर, सातारा, ४१५५११

**...................... याचिकाकर्ते**

**विरुध्द**

१. मुख्य अभियंता (ज.सं.) ज.सं.वि, सिंचन भवन, बार्ने रोड, मंगळवार पेठ, पूणे, ४११०११

२. सचिव, (ज.सं.व्य व सी.ए.डी.), ज. सं. विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२ (लक्षवेध– श्री. संजय टाटु, उ.स.सि.व्य.)

३. जिल्हाधिकारी, सातारा, जिल्हाधिकारी कार्यालय, पोवई नाका, सातारा, (लक्षवेध–श्री संतोष जाधव, उ. वि. य. फलटण)

४. अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा ४१५५०३.

५. अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन प्रकल्प, सिंचन भवन, कृष्ण नगर, सातारा ४१५५०३.

६. श्री. विलास नलावडे, हनुमंत पाणी वापर संस्था, अलजापुर, फलटण, सातारा, मार्फत, ॲड. व्ही. एस. टाळकुटे, ५ पहिला माळा, पारेख व्होरा चेंबर्स, ६६, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई, ४००००१

७. श्री. संतोष हनुमंतराव शिंदे, ज्योतिर्लींग पाणी वापर संस्था, कोपर्डे, ता.खंडाळा, जि. सातारा, ४१५५२१

.........**प्रतिवादी**

**कोरम:**

**श्री. के. पी. बक्षी, अध्यक्ष**

**श्री. व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य**

**(ज. स. अभियांत्रिकी)**

**श्री. विनोद जे. तिवारी, सदस्य, (विधी)**

**दि. २७.०२.२०२०**

# पार्श्वभूमि

१. धोम व धोम बलकावडी प्रकल्प यांच्यातील डी पी आर प्रमाणे पाणी वाटपाच्या PDRO यांनी दि. २५/०५/२०१८ च्या आदेशाविरूध्द श्री नंदकुमार दगडु माने (पाटील), चंद्रगिरी कालवा पाणी पृ १. पूर्ण घेणे वापर सहकारी सेवा संस्था म. रहिमतपुर (सातारा) व दोन इतर, दाखल केले होते. PDRO ने त्यांच्या अंतिम आदेशात म्हटले आहे की धोम व धोम बालकवाडी प्रकल्पाचे पाणी वाटप कालवा सल्लागार समितीच्या निर्णयानुसार, १५ ऑक्टोबर ची पाणी साठवण पाण्याचा असिंचन वापर, बाष्पीभवन ई. शासनाच्या नितीप्रमाणे, ध्यानात घेऊन करायला पाहिजे. या पी डी आर ओ च्या आदेशाने व्यथित होऊन अपीलार्थींनी या प्राधिकरणासमोर दि. १९ जून २०१८ ला अपील दाखल केले (प्र. क्र. ६/२०१८)

२. प्राधिकरणाने या प्रकरणात ३ सुनावण्या घेवून दि. ०९.०४.२०१८ ला अपिल निकालात काढले ज्याची अनुपालना सुनावणी करण्याचे १६.०७२०१९ ला करावयाचे ठरवले होते. प्राधिकरणाने अनुच्छेद निहाय दिलेल्या निर्देशांची अनुपालना तपासली.

३. प्रातिवादी क्रं. ४ यांनी अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ सातारा व प्रतिवादी क्रं ५ अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ सातारा, विभाग सातारा या दोघांच्या मार्फत तपशीलवार अनुपालना अहवाल दाखल शपथपत्रासह, दि. ०४ नोव्हेंबर २०१९ ला केला.

४. अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ सातारा यांनी अनुपालने विषयी उत्तर देण्यास उशीर झाल्याबद्दल केलेल्या अर्जामधे क्षमापित करण्याबद्ल विनंती केली: आणि प्राधिकरणाने जे निर्देश अनुच्छेद ३० (अ)(४) व (७) मधे दिले आहे त्याचे पुनर्विलोकन करण्यासाठी दि. २४/१२/२०१९ चा अर्ज दिला.

५. ॲड. विश्वनाथ टाळकुटे यांनी प्रतिवादी क्रं. ६, श्री विलास नलावडे, हनुमंत पाणीवापर को.ऑप. संस्था, अलतापूर, फलटण, सातारा यांच्या मार्फत प्राधिकरणाच्या ९ एप्रिल २०१९ च्या आदेशात पुनर्विलोकने अर्ज दिला.

६. ॲड. विश्वनाथ टाळकुटे यांनी श्री मनोज अनपट अध्यक्ष प्रस्तावित, पवनाई देवी पाणी वापर संस्था क्रं. ५ कोरेगाव, सातारा व इतर ३ यांचे मार्फत २४/०१/२०२० चा अर्ज प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (अ)(४) व (७) मधे निर्देशांचे पुनर्विलोकन करण्यासाठी अर्ज दिला.

**प्रतिवादी क्रं १,२,४ व ५ च्या दिनांक २४/१२/२०१९ च्या पुनर्विलोकन अर्जात केलेली प्रार्थना.**

७. प्रतिवादींनी प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशात त्याच्या पुनार्विलोकन अर्जात, काही सुधारणा करण्याचे सांगितले आहे व त्याची प्रत अर्जदार व मुळ प्रकरणामधील इतर प्रतिवादींना दिली आहे.

अ) मंजुर झालेल्या प्रकल्प अहवालातील तरतुदी प्रमाणे उष्ण हवामान हंगामात म्हणजे २८ फेब्रुवारी नंतर सिंचन आणि / किंवा पेयजलासाठी उपलब्ध करण्यासाठी, शासकीय उपसा सिंचन यंत्रणा व धोम डावा किनारा कालव्या व्दारे पाणी घेण्यास परवानगी द्यावी.

ब) धोम डावा किनारा कालव्यावरील व्याक्तिगत उपसा संचांना, रबी हंगामात वाढलेल्या रबी आवर्तनाच्या काळात म्हणजे २८ फेब्रुवारी नंतर पाणी घेण्यास परवानगी द्यावी.

क) जर एखाद्या वर्षात अतिरिक्त पाणी उपलब्ध असेल तर धोम डावा किनारा कालव्यावरील व्याक्तिगत उपसा संचांना, पाणी घेण्यास परवानगी द्यावी

ड) जर एखाद्या वर्षात अतिरिक्त पाणी उपलब्ध असेल तर हंगामा गणिक असलेल्या धोम बालकवाडीच्या पाण्याच्या वापरीवरील प्रतिबंध हटवावा.

ई) जर काही कारणाने रबी हंगामात वाढ झाली तर धोम बालवाडी कालवा २८ फेब्रुवारी नंतर सुरू ठेवावा

**प्रतिवादी क्रं ६ च्या दि. २४/०१/२०२० च्या पुनर्विलोकन अर्जातील प्रार्थना**

८. प्रतिवादीने खालील प्रमाणे सुधारणा करण्याची प्रार्थना केली आहे.

अ) या प्राधिकरणाने मंजुर केलेल्या आदेश क्रं. ३ दि. ०९/०४/२०२० प्रमाणे प्रकरण क्र. ६/२०१८ मधील आदेशातील अनुच्छेद ३० (अ) च्या खंड ७ चे गुणवत्तेवर त्यांचा पुनर्विचार करण्याची प्रार्थना केली आहे.

ब) या पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी व निर्णय होईपर्यंत आक्षेपित गुणवत्तेवर त्याचा पुनर्विचार होईपर्यंत त्यावरील कार्यवाही परिणाम, कार्यान्वयन तसेच अंमलबजावणीला स्थगिती द्यावी.

क) या पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी व निर्णय मा. प्राधिकरणाने संबंधित प्राधिकाऱ्यांना २८ फेब्रुवारी नंतर देखील धोम बालकवाडी कालव्याव्दारे सिंचनासाठी वासना, वांगना व कवठेकेंजल उपसा सिंचन योजनांना पाणी देण्याची परवानगी द्यावी.

ड) खंड (क्लॉज) – ब मध्ये केलेल्या प्रार्थनेनुसार अंतरिम कालीन अनुतोष देण्यात यावा.

इ) याचिकेचा खर्च देण्यात यावा.

फ) प्रस्तुत प्रकरणाची स्थिति व प्रसंग पाहता दुसरा एखादा योग्य तो अनुतोष देण्यात यावा

**श्री मनोज अनपट अध्यक्ष प्रस्तावित, पवनाई देवी पाणी वापर संस्था क्रं. ५ कोरेगाव, सातारा व इतर ३ यांचे मार्फत २४/०१/२०२० ला प्राधिकरणाच्या पुनर्विलोकन दिनांक २४/१२/२०१९ मध्ये केलेली प्रार्थना.**

९. अर्जदाराने त्याच्या पुनर्विलोकन अर्जात, खालीलप्रकारे सुधारणा करण्याची विनंती केली आहे.

अ) आदेश क्रं. ३ दि. ०९/०४/२०२० प्रमाणे प्रकरण क्र. ६/२०१८ मधील आदेशातील अनुच्छेद ३० (अ) च्या खंड ७ चे गुणवत्तेवर त्यांचे पुनर्विलोकन आणि पुढे उपसा सिंचन यंत्रणा, उदा. वासना उपसा सिंचन योजना, वांगणा उपसा सिंचन योजना व कवठे केंजल उपसा सिंचन योजना यांना विहित कोटयाप्रमाणे, २८ फेब्रुवारीच्या नंतर बारमाही सिंचनाची परवानगी द्यावी

ब) या पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी व निर्णय होईपर्यंत आक्षेपित गुणवत्तेवर त्याचे पुनर्विलोकन होईपर्यंत त्यावरील कार्यवाही परिणाम, कार्यान्वयन तसेच अंमलबजावणीला स्थगिती द्यावी.

क) या पुनर्विलोकन अर्जाची सुनावणी व निर्णय मा. प्राधिकरणाने संबंधित प्राधिकाऱ्यांना २८ फेब्रुवारी नंतर देखील धोम बालकवाडी कालव्याव्दारे सिंचनासाठी वासना, वांगना व कवठेकेंजल उपसा सिंचन योजनांना पाणी देण्याची परवानगी द्यावी.

ड) खंड (क्लॉज) – ब मध्ये केलेल्या प्रार्थनेनुसार अंतरिम कालीन अनुतोष देण्यात यावा.

इ) याचिकेचा खर्च देण्यात यावा.

फ) प्रस्तुत प्रकरणाची स्थिति व प्रसंग पाहता दुसरा एखादा योग्य तो अनुतोष देण्यात यावा

१०. **२९/०१/२०२० ला झालेल्या कामकाजाचा सारांश**

या सुनावणीला खालील प्रमाणे हजेरी होती.

१. श्री नंदकुमार डी. माने
२. श्री पी. पी. माने
३. श्री जगदिश पी पवार
४. श्री आर. जी. तांबे

.......... अपिलार्थी करिता.

५. ॲड ए. पी. पवार ........... अपीलार्थींचे वकील

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | श्री रोहित आर. पोळ | .......... | उपसचिव व अधिक्षक<br>अभियंता, ज.स.वि.<br>मंत्रालय, मुंबई, प्रतिवादी<br>क्रं. २ मार्फत |
| ७. | श्री संजय डोईफोडे | .......... | अधिक्षक अभियंता,<br>सातारा सिंचन मंडळ,<br>सातारा प्रतिवादी क्रं ४ |
| ८. | श्रीमती वैशाली कुरणे | ......... | अवर सचिव व कार्यकारी<br>अभियंता, ज.स.वि.<br>मंत्रालय, मुंबई, प्रतिवादी<br>क्रं. २ मार्फत |
| ९. | श्री. ए. एस. पवार | ........ | कार्यकारी अभियंता,<br>सातारा सिंचन विभाग,<br>सातारा, प्रतिवादी क्र. ४ करीता |
| १०. | श्री. ए. जे. साळुंखे | ......... | कार्यकारी अभियंता, धोम<br>बालकवाडी प्रकल्प<br>विभाग, सातारा |
| ११. | श्री नितीश पोतदार | ......... | सहायक कार्यकारी<br>अभियंता सातारा सिंचन विभाग,<br>सातारा, प्रतिवादी क्र. ४ करीता |

१२. अॅड. बी. टी. गायकवाड .......... अॅडव्होकेट, प्रतिवादी क्रमांक ४ करिता.

१३. अॅड. विश्वनाथ टाळकुटे .......... अॅडव्होकेट, प्रतिवादी क्रमांक ६ करिता

११. प्राधिककरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशानुसार, अनुपालनेच्या कार्यवाही बाबत प्रतिवादी क्र. ४ नी प्राधिकरणाला अवगत केले.

१२. प्राधिकरणाला आढळुन आले की अपीलार्थीबरोबर जो करारनामा होणार होता तो अजुन झाला नाही. तसेच कालव्याच्या दुरूस्तीमधे व व्यक्तिगत उद्वारी संचावर मीटर बसविण्या कामामधे समाधानकारक प्रगती झालेली नाही

प्रतिवादींनी व्यक्तिगत उदवाही माहिती वेबसाईट वर टाकली असली तरी देखील दिलेली माहिती स्वयं स्पष्ट नाही. कालवा गणिक, गावागणिक गोषवारा देण्याची गरज आहे. पाणी कोटा मंजुर केल्याची माहिती आहे पण पाणी वापराचे एकक दिले नाही.

१३. अॅड. ए. पी. पवार अपीलार्थीचे अॅडव्होकेट म्हणाले काही व्यक्तिगत कौटुंबीक कारणामुळे, प्रतिवादी कं. ४ ने जी पुनर्विलोकन याचिका दाखल केली होती त्यावर उत्तर आज सादर करण्यात आले नाही व त्या करिता त्यांनी २ आठवड्याचा वेळ मागितला. ते पुढे म्हणाले की जो पुनर्विलोकन अर्ज अॅड विश्वनाथ टाळकुटे यांनी दाखल केला होता, त्याची प्रत आजच मिळाली आणि त्यावर उत्तर देण्यासाठी २ आठवडयाचा वेळ मागितला.

१४. श्री. संजय डोईफोडे यांनी प्रतिवादी क्र. ४ च्या मदतनीस वकीलांसोबत, यांनी पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास उशीर झाल्याचे समर्थन केले. ही याचिका दाखल करण्यास २५९ दिवस लागण्याचे

कारण म्हणजे एप्रिल मे २०१९ असलेली तीव्र दुष्काळाची परिस्थिति व त्यानंतर जुन–सप्टेंबर २०१९ मधे आलेले मोठे पुर व सार्वत्रिक व विधान सभेच्या निवडणुका व शासकीय प्रतिवादयांच्या स्तरावर भिन्न भिन्न प्राधिकाऱ्यांकडुन मसुद्याच्या मंजुरीला लागलेला वेळ इ. तथापी आदेशाचे पुनर्विलोकन करावयाची विनंती अनुपालना शपथ पत्रात, दि. ०४/११/२०१९ ला केली होती.

१५. पक्षकारांचे म्हणणे ऐकुन घेतल्यावर प्राधिकरणाने अर्ज दाखल करण्यास लागलेला उशीर क्षमापित केला व अर्जाला परवानगी दिली.

१६. ॲड. बी. टी. गायकवाड, प्रतिवादी क्रं. ४ चे मार्फत दाखवुन दिले की प्राधिकरणाच्या २ अनुच्छेदात विसंगती असल्याचे दाखवुन दिले. अनुच्छेद ३० (अ)(४) मधे शासकीय उपसा सिंचन योजना व व्यक्तिगत उपसा संचधारक यांना धोम डावा किनारा कालव्यावतुन २८ फेब्रुवारी नंतर पाणी घेण्यास प्रतिबंध केला. तथापी, या आदेशाच्या अनुच्छेद १७ मधे म्हटले आहे. धोम कालवा व ३ शासकीय उपसा सिंचन योजनांना म्हणजे कवढे–केंजल, वासना व वांगना यांनी बारमाही हक्क प्रदान केलेले असल्यामुळे त्यांना कायम स्वरूपी पाणी वापर करता येतो. धोम डावा किनारा कालव्यावरील शासकीय उपसा सिंचन योजनांना उष्ण हवामानात सिंचनाची तरतूद सुध्दा आहे. त्यामुळे त्यांनी विनंती केली की प्राधिकरणाने त्याप्रमाणे त्यांच्या आदेशात बदल करावा.

१७. ॲड बी. टी. गायकवाड, पुढे म्हणाले की व्यक्तिगत उपसा संच धारकांना देखील २८ फेब्रुवारी नंतर पाणी घेण्याची परवानगी देण्यात यावी. प्राधिकरणाने विचारल्यावरून श्री संजय डोईफोडे यांनी सांगितले की सिंचन विभागाच्या शा.नि. दिनांक २१/११/२००२ मधे ज्या अटी विनिर्दिष्ट केल्या आहेत त्या व्यक्तिगत उपसा संच धारकांनी पुर्णता पाळलेल्या नाहीत.

१८. श्री संजय डोईफोडे, प्रतिवादी क्रं.४ म्हणाले की वर्ष २०१९ हे अधिशेष वर्ष होते, आणि १५ ऑक्टोबर ला दोन्ही धरणे १००% भरले होते. त्यावेळी जोरदार पाउस झाल्यामुळे खरीप आवर्तनाची मागणी नव्हती. त्यामुळे, उष्ण हवामानात आवर्तनाची परवानगी मागण्यात आली. ॲड. बी. टी.

गायकवाड म्हणाले की धोम बालकवाडी प्रकल्पाचे पाणी वापर नियोजन १.४२ टी.एम.सी. खरीप व १.२८ टीएमसी रब्बी हंगामाचे आहे. ते पुढे म्हणाले काही कारणाने रबी आवर्तनाचा हंगाम जर २८ फेब्रुवारी पर्यंत पुर्ण झाला नाही तर ही कालमर्यादा काही दिवसांकरीता वाढवावी. ते म्हणाले धोम बालकवाडी प्रकल्पाचे जे काम सध्या चालु आहे, त्यामुळे आवर्तनाचा काळ वाढविणे अपरिहार्य ठरते.

१९. श्री संजय डोईफोडे समोर म्हणाले की वर्ष २०१९ मधे पुराच्या काळात धोम बालकवाडी कालव्यातुन पाणी सोडण्यात येवुन त्याने कृष्णानदीच्या पुराचा प्रभाव कमी करण्यासाठी लहान तलाव भरण्यात आले. या कारणावरून त्यांनी सांगितले की पुराच्या काळात जे पाणी गेले ते धोमबालकवाडीच्या कालव्याच्या कोटयात समाविष्ट करू नये.

२०. श्री एन. डी. माने अपीलार्थी म्हणाले की अधिशेष पाणी समन्यायी तत्वाने, एकुण वापर जो १८.२४ टी. एम. सी. चा आहे, त्या प्रमाणात तो वाटून घ्यावा, क्षेत्र अधिकाऱ्यांनी आता आम्हाला सुधारीत कोटा दिला आहे. शासकीय उपसा सिंचन योजना व व्यक्तिगत उपसा संचधारकांना २८ फेब्रुवारी नंतर पाणी घेण्याची परवानगी नाकारावी. प्राधिकरणाने सांगितले की, अपीलार्थीचे हे म्हणणे मुळ अर्जाच्या कामकाजाच्या दरम्यान ऐकले आहे व ते प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशामधे, घेतले आहे. जर अपीलार्थीचे वाटप केलेल्या पाण्याच्या कोटयाने समाधान झाले नसेल तर त्यांनी तसा नवीन अर्ज दाखल करावा कारण याचा विचार पुनर्विलोकन कामकाजात करता येत नाही.

## मुद्दे साचेबध्द करणे

२१. पुनर्विलोकनात आदेशाचा विचार करून, पुनर्विलोकनाची कारणे व पक्षकारांनी सादर केलेल्या माहितीचा विचार केल्यास, प्राधिकरणाच्या विचारार्थ खालील मुद्दे उद्‌भवले आहेत.

**(१) प्राधिकरणाने आधी दिलेल्या निर्देशांची अनुपालना समाधानकारकपणे झाली आहे काय ?**

**(२) पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात झालेला उशीर क्षमापित करण्यासारखा आहे काय?**

**(३) प्राधिकरणाच्या ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (ए)(४) चे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे काय ? जर होय, तर कोणते बदल आवश्यक आहे?**

**(४) प्राधिकरणाच्या ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (ए)(४) चे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे काय ? जर होय, तर कोणते बदल करण्याची गरज आहे?**

**(५) जे मुद्दे पुनर्विलोकन अर्जात आले आहे त्यावर काही स्पष्टीकरण देण्याची गरज आहे काय?**

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

२२. प्राधिकरणाचे वरील मुद्यांवरील निष्कर्ष खाली दिले आहेत.

(१) प्राधिकरणाने आधी दिलेल्या निर्देशांची अनुपालना समाधानकारकपणे झाली आहे काय ? प्राधिकरणाला आढळुन आले की :

अ) पाणी वापर कर्त्या (संस्था) सोबत अजुन करार झालेले नाही.

ब) दिलेल्या अटींचे पालन न करता, व्यक्तिगत उपसा संचधारक पाणी घेत आहेत.

क) कालवा दुरूस्तीचे काम अजुन पुर्ण झालेले नाही. धोम कालव्याच्या रचने प्रमाणे नियोजित पाणी वाहुन नेण्याची क्षमता अजुन पुर्ववत झालेली नाही.

ड) व्यक्तिगत उपसा संच धारकांची माहिती स्वयं स्पष्ट नाही. त्यामध्ये योग्य ते एकक दर्शवावे. तसेच गावागणिक गोषवारा वेब वर टाकुन माहिती जाहिर करावी.

**अशा प्रकारे जो मुद्दा विचारार्थ घेतला आहे. त्याचे उत्तर नकारार्थी येते.**

**(२) पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात झालेला उशीर क्षमापित करण्यासारखा आहे काय?**

अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा, अर्जदार क्र. ३ व प्रतिवादी क्र. १, २ व ४ मार्फत पुनर्विलोकन अर्ज (प्रतिवादी क्रं. १,२,४ व ५ / प्र.क्र. ६/२०१८) यांनी पुनर्विलोकन अर्ज दि.

२४/१२/२०१९ चा प्र. क्र. ६/२०१८ मधील, तसेच हा अर्ज दाखल करण्यास उशीर झाल्यामुळे उशीर क्षमपित करण्यासाठी, दाखल केला. हा पुनर्विलोकन अर्ज दाखल करण्यास २५९ दिवसांचा उशीर झाला. जी कारणे यास्तव प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिली आहेत, ती अशी आहेत.

अ) या वर्षी एप्रिल व मे महिन्यात सातारा जिल्हयात तथा विशेषकरून फलटण, खंडाळा व कोरेगाव तालूक्यात तीव्र दुष्काळ पडला होता. हे तालुके धोम व धेम बालकवाडी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात येतात. तीव्र दुष्काळाची तीव्रता कमी करण्याच्या कामात, म्हणजे पेयजलाचा पुरवठा, कालवा व शासकीय उपसा सिंचन योजनांव्दारा करण्यात कर्मचारी गुंतले होते.

ब) त्यानंतर २०१९ च्या जुन महिन्यापासुन ही पुनर्विलोकन याचिका दाखल करीपर्यंत धोम व धोम बालक वाडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात बराच पाऊस झाला. जलाशयाचे गेट (झडपा) उघडुन योग्य रितीने पुराचे पाणी वळवुन पुर परिस्थिति नियंत्रीत करण्याचे काम बरेच दिवस म्हणजे आक्टोबर २०१९ पर्यंत चालले. अर्जदार ३ व ४ चे कर्मचारी व यंत्रणा पुर स्थितिवर देखरेख ठेवण्यासाठी कार्यरत होते.

क) ऑगस्ट २०१९ च्या महिन्यात शासनाने पुरस्थितिचे मुल्यांकन करणे व त्यासाठी त्याची तिव्रता कमी करण्यासाठी दुरगामी उपाय सुचवण्याकरिता वडनेरे समिति ची स्थापना केली प्रतिवादी क्रं. १ व त्यांच्या हाताखाली असलेली कार्यालय हे सभांमधे व समितिसाठी आकडेवारी गोळा करण्यात कार्यरत होते.

ड) मध्यंतरीच्या काळात म्हणजे सप्टेंबर महिन्यात लोकसभा उप निवडणुका सातारा लोकसभा मतदार संघात व विधानसभा निवडणुका जाहिर झाल्यात. या साठी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात अर्जदार ३ व ४ शी संबंधित बहुतेक सर्वच कर्मचारी निवडणुकीच्या कामावर होता.

इ) अर्जदार ३ व ४ यांच्या कार्यालयात रिक्त जागा अंदाजे ४०% होत्या.

फ) हे प्रकरण धोम प्रकल्प, धोम–बालकवाडी प्रकल्प त्याच प्रमाणे शासकीय उपसा सिंचन योजना व धोम डावा किनारा कालवा, इ. ची कार्यक्षेत्रे ही वेगवेगळया मंडळात, विभागात व उपविभागात विखुरलेली आहेत. त्यामुळे संबंधित आकडेवारी विविध कार्यालयातुन प्राप्त करून घेण्यात बराच वेळ गेला.

**प्राधिकरणाचे निष्कर्ष :** प्राधिकरणाचे विचारार्थी असे मत आहे की अर्जदारांनी जी कारणे दिली आहेत ती खरी असुन, त्यांच्या नियंत्रणाच्या बाहेरची होती. त्यामुळे प्राधिकरणाने झालेला उशीर क्षमापित करून पुनर्विलोकन याचिका दाखल करून घेतली.

**अशाप्रकारे विचारात घेतलेल्या या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.**

जे वर दर्शवले आहे, त्यानुसार झालेला उशीर क्षमापित करून व आदेशाच्या कार्यान्वित भागात दिल्याप्रमाणे तसेच पुढे आलेल्या अनुच्छेदामधे दिलेल्या निष्कर्षासह पुनर्विलोकन याचिका विचारात घेण्यात आल्या आहे.

**(३) प्राधिकरणाच्या ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (ए)(४) चे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे काय ? जर होय, तर कोणते बदल आवश्यक आहे?**

अर्जदार क्र. ३ यांनी अर्जदार क्र. १,२, व ४ मार्फत दिलेल्या पुनर्विलोकन अर्जात, प्राधिकरणाच्या प्र. क्र. ६/२०१८ मधे दिलेल्या ०९/०४/२०१८ च्या आदेशात असलेल्या काही चुकांकडे लक्ष वेधले. अर्जदाराने दर्शविले की धोम डावा किनाऱ्यावरील कालव्यावर असलेल्या काही शासकीय उपसा सिंचन योजनांमधे तीन हंगामाच्या पिकांचे आकृतिबंध आहेत. तथापी, प्राधिकरणाने या योजनांना उष्ण हवामान हंगामात पाणी देण्यावर प्रतिबधं लावला आहे, म्हणजे २८ फेब्रुवारी नंतर पाणी देण्या विषयी.

**प्राधिकरणाचे निष्कर्ष :** प्राधिकरणाने दिलेल्या दिनांक ०९/०४/२०१९ मुळ आदेशाच्या अनुच्छेद १७ मधे धोम डावा किनाऱ्यावरील कालव्यावर असलेल्या काही शासकीय उपसा सिंचन योजनांमधे तीन हंगामाच्या पिकांचे आकृतिबंध आहेत हे मान्य केले. तथापी, प्राधिकरणाने या योजनांना उष्ण हवामान हंगामात पाणी

देण्यावर प्रतिबधं लावला आहे. म्हणजे २८ फेब्रुवारी नंतर पाणी देण्या विषयी पाणी नियोजनाचे समर्थन केले आहे. तसेच धोम डावा किनाऱ्यावरील कालव्यावर असलेल्या काही शासकीय उपसा सिंचन म्हणजे कवठे केंजळ, वासना व वांगना मधे तसेच व्यक्तिगत उपसा सिंचन संचासाठी प्रकल्पाच्या नियोजनात काही खास तरतुद केलेली नाही. तथापी, त्यांना सिंचन विभागाच्या दि. २१/११/२०१९ च्या शासन निर्णयानुसार पाणी मिळण्याची तरतुद केली आहे, पण त्यामुळे कालव्यातुन वाहणाऱ्या पाण्याचा कोटा कमी होतो. संमती असल्यामुळे व्यक्तिगत उपसा सिंचन संच धारकांना जर उष्ण हवामान हंगामात पाणी घेण्याची परवानगी दिली असेल व ते सर्व अटी शर्तीचे ज्या वर दिलेल्या शा.नि. नमुद केल्या आहेत, तर त्यांना पाणी घेण्याचा हक्क आहे. प्राधिकरणाने जेव्हा व्यक्तिगत उपसा सिंचन संच धारकांची परवानगीची माहिती घेतली जी अर्जदाराने वेबसाईट वर, प्राधिकरणाने दिलेल्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशाच्या अनुपालनार्थ, प्रकाशित केली आहे, तेव्हा प्राधिकरणाला आढळुन आले की काही व्यक्तिगत उपसा सिंचन संच धारकांना उष्ण हवामान हंगामाचा कोटा मंजुर केला आहे. त्यामुळे आदेशात दुरूस्ती करणे गरजेचे आहे.

**अशारितीने या मुद्याच्या पहिल्या भागाचे उत्तर होकारार्थी येते.**

दिलेल्या शासकिय उपसा सिंचन योजना व धोम कालव्याचा आकृतिबंध लक्षात घेऊन दि. ०९/०४/२०१९ मुळ आदेशात दुरूस्ती करणे/बदल करणे गरजेचे आहे.

**(४) प्राधिकरणाच्या ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (ए)(४) चे पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे काय ? जर होय, तर कोणते बदल करण्याची गरज आहे?**

अर्जदार क्र. १,२,३ आणि ४ यांनी त्यांच्या २४/१२/२०१९ च्या पुनर्विलोकन अर्जात काही व्यवहारीक मुद्दे दिले आहे. त्यापैकी एक म्हणजे काही कारणामुळे रबी हंगामाचे आवर्तन धोम बालकवाडी कालव्याचे २८ फेब्रुवारी पर्यंत पुर्ण होऊ शकले नाही; तर हे आवर्तन, मंजुर कोटयाच्या अधीन राहुन, २८ फेब्रुवारीच्या पुढे वाढविण्याची विनंती केली आहे.

प्रतिवादी क्र. ६ यांनी मुळ प्रकरणात वेगळया पुनर्विलोकन अर्जाव्दारे प्रार्थना केली आहे की प्राधिकरणाचे त्यांच्या निर्देशाचे पुनर्विलोकन, अनुच्छेद ३० (अ) च्या (७) जे त्यांच्या ०९/०४/२०१८ च्या आदेशात करावे आणि धोम—बालकवाडी कालव्यातुन मंजुर कोटयाच्या अधिन राहुन, दि. २८ फेब्रुवारी नंतर पाणी सोडावे.

या मुद्यावर दि. २९ जानेवारी २०२० मधे झालेला प्राधिकरणाच्या कामकाजाच्या वेळी सुध्दा विचार करण्यात आला.

**प्राधिकरणाचे निष्कर्ष :** या प्राधिकरणाचे विचारांती असे मत आहे की, जर धोम—बालकवाडी कालव्यातुन मंजुर कोटयाच्या अधिन राहुन, दि. २८ फेब्रुवारी नंतर पाणी, जर काही कारणांमुळे हा कोटा २८ फेब्रुवारी पर्यंत पुर्ण होऊ शकत नसल्यास या काळांत वाढणाऱ्या बाष्पी भवनाच्या हानीचा विचार, पाणी साठवणी मुळे झाल्याचा हिशेब केला असल्यास, दुसऱ्या बाजुचे या बाबतीत पुर्वग्रह दुषित होण्याचे काही कारण दिसत नाही.

**अशा प्रकारे या भागाचे उत्तर होकारार्थी येते.**

**(५) जे मुद्दे पुनर्विलोकन अर्जात आले आहे त्यावर काही स्पष्टीकरण देण्याची गरज आहे काय ?**

अर्जदारांनी खालील मुद्यांवर स्पष्टीकरण मागितले आहे.

अ) धोम डावा कालव्यावरील व्यक्तिगत उपसा संच, जर रबी आवर्तन २८ फेब्रुवारी पर्यंत पुर्ण झाले नसल्यास, पाणी घेण्याचे हक्कदार आहेत काय?

ब) जर एखाद्या वर्षी उष्ण हवामान हंगामात अधिशेष पाणी उपलब्ध असल्यास व्यक्तिगत उपसा सिंचन संच हे पाणी घेण्याचे हक्कदार आहेत काय?

या प्रश्नांवर, प्राधिकरणाचे मत असे आहे :—

अ) पुरेशी देखभाल न झाल्यामुळे धोम डावा किनारा कालव्याचे पाणी वाहुन नेण्याची क्षमता कमी झाली आहे, असे प्राधिकरणाने त्यांच्या ०९/०४/२०१८ च्या मुळ आदेशाच्या

अनुच्छेद २७.१५ मधे सांगितले आहे. प्राधिकरणाची खात्री झालेली आहे की प्राधिकरणाने त्यांच्या ०९/०४/२०१८ च्या मुळ आदेशाच्या अनुच्छेद झाल्यामुळे कालव्याचे आवर्तन ठरलेल्या कालावधी मधे पुर्ण होऊ शकत नाही. ज्यामुळे रबी आवर्तनात २८ फेब्रुवारीच्या नंतर वाढ होणे भाग आहे. अशाप्रकारे शासकीय उपसा सिंचन योजना किंवा कायदेशीर व्यक्तिगत उपसा संच धारकांना, ज्यांनी सर्व अटी, शर्तीची अनुपालना केली आहे, परंतु त्यांचा कायदेशीर कोटा त्यांना २८ फेब्रुवारी पर्यंत मिळु शकला नाही, तर त्यांना त्यांचा कायदेशीर कोटा उचलण्याची परवानगी २८ फेब्रुवारी नंतर देखील द्यावी.

ब) जर व्यक्तिगत उपसा संच धारक यांना उष्ण हवामान हंगामात पाणी घेण्याचा हक्क दिलेला नसेल तर, अधिशेष उष्ण हवामान हंगामान पाणी घेण्याचा हक्क मिळणार नाही. याबाबतीत अधिशेष पाणी असल्यास प्राधिकरणाने त्यांच्या ०९/०४/२०१८ च्या मुळ आदेशाच्या अनुच्छेद ३० (३०)(७) मधे अधिशेष पाणी वाटपाबाबत विनिर्दिष्ट निर्देश दिलेले आहेत.

## निर्देश

२३. पुनर्विलोकन अर्ज दाखल करून घेतल्या नंतर, सर्व पक्षांचे या वादात, म्हणणे ऐकले व जे कागदपत्र व आकडे वारी, माहिती अभिलेखात आहे व पक्षकारांनी ते सादर केलेले त्यांचा विचार करून प्रधिकरणाला विचारार्थी पुढील निर्देश देणे धोरणीपणाचे वाटले.

१) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक ०९/०४/२०१९ च्या, प्राधिकरणाने आधी दिलेल्या, निर्देशाची अनुपालना करतील व तसे, वर अनुच्छेद २२(१) मधे नोंदविलेली निरिक्षणे सुध्दा आणि जे बरेचसे निर्देश दिनांक ०९/०४/२०१९ च्या आदेशात दिले आहे ते विचारात घेऊन, अनुपालन शपथपत्र सादर करतील.

२) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा प्रतिवादी क्र. ४ हे शपथपत्रात निवेदन देतील की धोम कालव्याची पाणी वाहुन नेण्याची नियोजित (रचनेत असलेली) क्षमता व सद्यस्थितिमधे त्याच्या प्रत्येक भागात असलेली पाणी वाहुन नेण्याची क्षमता, या आदेशाच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत सादर करतील.

वर दिलेल्या मुद्दे क्र. १ व २ वर, अनुपालना अहवाल ३० दिवसांच्या आत दाखल करावा. जर अनुपालना समाधानकारक नसेल तर गरज भासल्यास अधिक तपशील मागवुन, प्राधिकरण सुनावणी घेईल.

३) प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (अ)(४) मधे दुरूस्ती करून, त्यात खालील प्रमाणे बदल होईल, वाचा :–

अनुच्छेद ३० (अ)(४) :– धोम जलाशयाचे व त्यावरील कालव्याचे व्यक्तिगत उपसा संच धारक, त्यांना दिलेल्या परवानगी पत्रात असलेल्या सर्व अटींची तसेच शासन निर्णय २१/११/२००२ मधे दिलेल्या अटींची अनुपालना करतील व हंगामा गणिक मंजुर झालेल्या कोटयाच्या अधिन राहुन पाणी घेतील, व हे सर्व तेंव्हाच कार्यान्वित होईल जेव्हा विनिर्दिष्ट अटींची अनुपालना झाली आहे. यांची खातरजमा करतील. व पुढे देखील खात्री करून घेतील की प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद १७ मधे जो कोटा विनिर्दिष्ट केला आहे, धोम कालवा व व्यक्तिगत उपसा संचाचे, एकत्र विचार करून येणाऱ्या पाणी वापराची मात्रा या कोटयाच्या वर राहणार नाही.

४) प्राधिकरणाच्या दि. ०९/०४/२०१९ च्या आदेशातील अनुच्छेद ३० (अ)(७) मधे दुरूस्ती करून, त्यात खालील प्रमाणे बदल होईल, वाचा :–

अनुच्छेद ३० (अ)(७) :—

साधारण वर्षात धोम—बलकावडी कालव्यात सोडणारे पाणी २.७० टीएमसी पर्यंत १.४२ टीएमसी खरीप मधे व १.२८ टीएमसी रबी मधे मर्यादित राहील याची खातरजमा करुन घ्यावी. धोम बलकावडी प्रकल्प ८ माही असल्यामुळे, त्यातुन सिंचनासाठी २८ फेब्रुवारी नंतर पाण्याचा उपसा होणार नाही.

परंतु, आणखी असे की, जर काही कारणाने, व्यवहारीक अडचणी मुळे खरीप किंवा रबी हंगामा लांबला आणि पाणी २८ फेब्रुवारी पर्यंत देता आले नाही, तर रबी आवर्तन २८ फेब्रुवारी च्या पुढे जाऊ शकते. तथापी, अशा स्थितीत अतिरिक्त बाष्पीभवन हानी, काही असल्यास, जलाशयात पाणी साठा जास्त काळ असल्यामुळे, ज्याचा विचार प्रकल्पाच्या पाणी नियोजनात केलेला नाही, त्या प्रमाणात त्याचा हिशोब आधी न दिलेले पाणी सोडतांना करावा.

५) व्यक्तिगत उपसा सिंचन धारक ज्यांनी त्यांना दिलेल्या परवानगी पत्रात असलेल्या सर्व अटींची तसेच शासन निर्णय २१/११/२००२ मधे दिलेल्या अटींची अनुपालना केली आहे, आणि ज्यांना उष्ण हवामान हंगामाचा कोटा मंजुर आहे किंवा ज्यांनी रबी कोटयाचे पाणी देण्याचे राहुन गेले आहे, अशाच उपसा संच धारकांना २८ फेब्रुवारी नंतर पाणी घेण्याची मुभा राहील व हे मंजुर पाणी कोटयाचे अधिन असेल.

६) अधिक्षक अभियंता, सातारा सिंचन मंडळ, सातारा प्रतिवादी क्र. ४ हे दरवर्षी कार्यालयीन आदेश काढतील व पाण्याचा तुटवडा किंवा अधिशेष असतांना, जे निर्देश अनुच्छेद ३० अ (७) मधे दिले आहे, त्याप्रमाणे ते पाण्याचे वाटप करतील.

७) सर्व पुनर्विलोकन अर्ज निकालात काढले आहेत, कारण त्यामध्ये सर्व उद्‌भवलेल्या मुद्यांचे निराकरण या आदेशाच्या वरील अनुच्छेदात केले आहे.

८) जर पक्षकार प्रतिवादी क्र. ४ च्या आदेशाने, तुटवडा असलेल्या किंवा अधिशेष असलेल्या पाण्याच्या वाटपामुळे, व्यथित झाल्यास, तर ते पक्षकार हे PDRO कडे मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या कलम २२ अंतर्गत, वेगळी याचिका करू शकतात.

९) खर्चाविना.

दिनांक २७/०२/२०२० ला जारी केले.

स्वा.
(विनोद जे. तिवारी)
सदस्य (विधि)

स्वा.
(व्ही. एम. कुळकर्णी)
सदस्य (ज.सं. अभियांत्रिकी)

स्वा.
(के. पी. बक्षी)
अध्यक्ष